मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 20 नोव्हेंबर 2025 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# समाजाचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास

## विकसनशील प्रभाग : 02

पिंपरी | प्रतिनीधी :उच्च शिक्षित, दूरदृष्टी, नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्य असणाऱ्या प्रभावी उमेदवार प्रभाग क्रमांक दोन च्या विकासासाठी कविताताई आल्हाट या एक सक्षम आणि प्रभावी नेतृत्वाचा पर्याय आहेत. गेली चार वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या ताईंना समाजकारण आणि राजकारणाचा कौटुंबिक वारसा लाभला आहे. माजी आमदार सुरेश गोरे, हरिभाऊ आल्हाट, आणि रोहिदास आल्हाट यांचा समर्थ वारसा त्या पुढे नेत आहेत. समाजातील वंचित व उपेक्षित घटकांपर्यंत विकासाचे लाभ पोहोचवणे हे त्यांचे प्रमुख ध्येय आहे. युवा, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठोस काम करण्यासाठी त्या प्रामाणिकपणे प्रयत्नशील आहेत.






## पूर्णांगिनी द्वारे विधवा महिलांना सन्मान

पुरोगामी कृतीतून सन्मान: अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी 'पूर्णांगिनी' हा हळदीकुंकू समारंभ आयोजित करून विधवा महिलांचा यथोचित सन्मान केला. पुरोगामी विचारांचा वारसा कृतीतून सिद्ध केला. परिसरातील विधवा महिलांना साडीचोळी देऊन हळदीकुंकू कार्यक्रम केला.

कला आणि संस्कृतीला वाव: गेली तीन वर्षे सातत्याने मंगळागौर स्पर्धा आयोजित करून महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

नवदुर्गांचा सन्मान: या विशेष उपक्रमातून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो. पोलिस, वकिल, डॉक्टर, शिक्षिका, सफाई कर्मचारी अशा विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान केला.

## महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सुधारणा

अर्थार्जनासाठी प्रशिक्षण: महिला चूल आणि मूल यात अडकून न राहता स्वावलंबी व्हाव्यात यासाठी प्रशिक्षण वर्ग घेतले, ज्यामुळे त्यांना अर्थार्जन करता आले. महिला स्वावलंबी झाल्या. बेकरी, कुकिंग, केक, आरीवर्क असे विविध प्रशिक्षण वर्ग राबविले.

## आरोग्य आणि जीवनमान सुधारणा

कर्करोगमुक्त प्रभाग: समाजात कर्करोगाचे, विशेषतः महिलांमध्ये, वाढते प्रमाण लक्षात घेऊन आरोग्य शिबिरे घेतली. वेळीच निदान झाल्यामुळे अनेक भगिनींना जीवघेण्या आजारातून मुक्ती मिळवून त्यांचे जीवनमान आनंदी केले.
ज्येष्ठांसाठी सुविधा: वृद्धांसाठी आरोग्य शिबिर घेऊन चष्म्याचे वाटप केले. वाढत्या शहरीकरणात येणारा एकटेपणा दूर करण्यासाठी 'नाना-नानी पार्क' (विरंगुळा केंद्र) उभारण्याचा त्यांचा संकल्प आहे.

## प्रभागासाठी आगामी ध्येये आणि संकल्प

कविताताई आल्हाट यांना प्रभाग क्रमांक २ मध्ये काम करण्याची संधी मिळाल्यास, त्या पुढील प्रमुख मुद्द्यांवर भर देतील:

**एकसंघ आणि आनंदी प्रभाग :** त्यांचे ७० जणांचे एकत्र कुटुंब ज्याप्रकारे गुण्यागोविंदाने नांदते, तोच आदर्श ठेवून प्रभागाला एकसंघ आणि आनंदी ठेवण्यासाठी त्या प्रयत्नशील राहतील.

**मूलभूत सुविधांवर लक्ष :** शहराच्या झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे अपुऱ्या पडणाऱ्या मूलभूत सुविधा (पाणी, रस्ते, वीज) यावर प्राधान्याने काम करतील.

**महत्त्वाचे प्रकल्प :** भामा आसखेड पाणी प्रकल्प मार्गी लावणे, वाहतूक कोंडी सोडवणे, आणि वीज व रस्त्यांचे प्रश्न



सोडवण्यावर त्यांचा विशेष भर असेल.
विद्यार्थी खेळाडू यांसाठी अद्ययावत खेळाचे मैदान, क्रीडांगण, जलतरण तलाव उभारणे. ज्येष्ठ नागरिकांसाठी नाना नानी पार्क, विरंगुळा केंद्र उभारणे. मोबाईलच्या युगात दिवसेंदिवस लोप पावत चाललेली वाचन संस्कृती रुजविण्यासाठी चांगल्या प्रकारची आधुनिक सार्वजनिक वाचनालयाची उभारणी करणे.

**स्थानिक तरुणांना रोजगार:** प्रभागलगत असणाऱ्या एमआयडीसी परिसराचा फायदा स्थानिक सुशिक्षित व युवा बेरोजगार युवकांना मिळावा, यासाठी त्या आग्रही भूमिका घेतील.

## कोविड काळात उल्लेखनीय सेवा

घरोघरी जाऊन चाचण्या: दाट वस्तीत कोविडचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन, स्वतः वस्त्यांमध्ये घरोघरी जाऊन नागरिकांच्या आरटीपीसीआर चाचण्या करून घेतल्या, ज्यामुळे नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहिले.

